जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 AUG 2025
लोकमत

# २०० विद्यार्थ्यांची पुनर्प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागातील ४०० रिक्त जागांसाठी दुसऱ्यांदा सोमवारी पुनर्प्रवेश परीक्षा घेण्यात आली. ही परीक्षा २०१ विद्यार्थ्यांनी दिली. नोंदणी केलेले ३४ विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित राहिले. त्यामुळे अद्यापही २०० जागा रिक्त राहिल्या आहेत. अधिविभागांमधील २८ अभ्यासक्रमांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशाच्या एकूण जागा १५१० इतक्या आहेत. त्यासाठी पहिल्या फेरीमध्ये ८३७ विद्यार्थी प्रवेशित झाले. दुसऱ्या फेरीमध्ये २६७ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले.

## अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

एम.एस्सी.केमिस्ट्री- ८२, एम.एस्सी.बॉटनी-३, एम.एस्सी.झुलॉजी-६, एम.एस्सी. फिजिक्स-६, एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स- ३, एम.एस्सी.ॲग्रो केमिकल ॲड पेस्ट मॅनेजमेंट-५, एम.एस्सी. पर्यावरणशास्त्र-११, बॅचलर ऑफ जर्नालिझम-२, मास्टर ऑफ जर्नालिझम-४, एम.टेक. रुरल टेक्नॉलॉजी-२, एम.ए.योगा सायन्स-६, एम.एस्सी.फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी-६, एमबीए रुरल मॅनेजमेंट-११, एमएसडब्लू-७, एम.ए.एमएस्सी भूगोल-१२, एम.एस्सी स्टॅटस्टिक-१ यासह २३ अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांनी पुनर्प्रवेश परीक्षा दिली

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 AUG 2025
तरुण भारत

# पाच सर्टिफिकेट कोर्स बंद करण्याचा निर्णय

■ शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेची बैठक

प्रतिनिधी
कोल्हापूर

सांगली जिल्ह्यातील आप्पासाहेब बिरनाळे महाविद्यालयातील एम. आर्किटेक्चर अभ्यासक्रम बंद करण्यास मान्यता देण्यात आली. तर कोल्हापुरातील महावीर कॉलेजमधील बीव्होक, केमिकल टेक्नॉलॉजी सर्टिफिकेट कोर्स, इन्फरमेशन ॲण्ड कॉम्प्युटर बेसिक, इंग्लिश कम्युनिकेशन पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, अकौंटन्शी टॅक्निशियन सर्टिफिकेट कोर्स बंद करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

शिवाजी विद्यापीठात सोमवारी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीत नाईट कॉलेजचा स्वायत्त दर्जा रद्द करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रमात बदल करण्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये



लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा कशी असावी. तसेच ६०–४० पॅटर्न कसा असावा. शिक्षकांचा वर्कलोडसह अन्य विषयावर चर्चा झाली. जयसिंगपूर कॉलेजमधील भौतिकशास्त्र व प्राणीशास्त्र विषयाला शिवाजी विद्यापीठाचे कायमस्वरूपी संलग्नीकरण देण्यास मान्यता देण्यात आली. खासगी विद्यापीठातील सात जणांच्या पीएच. डी. समकक्षता प्रस्तावाला मान्यता तसेच बहाई ॲकॅडमीला कायमस्वरूपी संलग्नीकरणासह विद्या परिषदेत एकूण ३५ विषय किरकोळ दुरूस्तीसह मान्यता देण्यात आली.